महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 23/02/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### फसवणुक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर मौजा रामटेक येथे दिनांक 21/02/2021 चे 09.00 वा. ते 20.00 वा. पर्यंत फिर्यादी नामे– ईश्वर गुलाब सावरकर, रा. मानापुर यांनी आपले भारतीय स्टेट बॅक शाखा, रामटेक खात्याचे क्रेडीट कार्ड फिर्यादीकडे असल्याने व फिर्यादी यांनी सदर क्रेडीट कार्ड वरती धानाचे मिळालेले पैसे एकुण 82,158/– रु. जमा केले होते. सदर रक्कम फिर्यादी यांचे खातेवर जमा झाले. याबाबत शाहनिशा करणे कामी फिर्यादी बॅकेत जावुन विचारणा केली असता मॅनेजर यांनी सांगीतले की, ''तुमचे खात्यातुन क्रेडीट कार्ड व्दारे ऑनलाईन शॉपींग करून सदर खात्यातुन 82,158/– रु कमी झाले आहेत. यावरून फिर्यादीचे लक्षात आले की अज्ञात आरोपीने क्रेडीट कार्ड व्हेरीफिकेशनचे नावाने फिर्यादीकडुन क्रेडीट कार्ड संबधाने ओटीपी प्राप्त करून फियादीचे खात्यातुन रक्कम काढुन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66(सी) 66(डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद मकेश्वर 9049965014 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– दिनांक 22/02/2021 चे 09.15 वा. सुमारास फिर्यादी यांचे वडील नामे– योगेश मोहनलाल शाहू, वय 55 वर्ष, रा टिचर कॉलनी कोंढाळी हे त्यांची होन्डा शाईन मो.सा क्र. एमएच–40/ एयु–2786 ने कोंढाळी वरून सोलार कंपनी चाकडोह येथे जात होते. त्यादरम्यान मौजा रिंगणाबोडी शिवारात राजकमल हॉटेल समोर एनएच–6 रोडवर ट्रक क्र. एमएच–38/एक्स–8880 चा चालक आरोपी नामे– मनोज कुमार सोहनलाल यादव, वय 24 वर्ष, रा. भदोही वाराणसी रा. उत्तरप्रदेश याने आपले ताब्यातील ट्रक अमरावती कडून नागपूर कडे जातांना भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीचे वडीलाचे मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात योगेश शाहू यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रितीक योगेश शाहू, वय 21 वर्ष, रा टिचर कॉलनी ता काटोल जि नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ), 338 भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री राम ढगे 9518979499 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर